# द्विस्तरीय पेन्शन अदालत

निवृत्ती वेतन ही एक सामाजिक आर्थिक व्यवस्था आहे ३० ते ४० वर्षे नोकरी केल्यानंतर वृद्धापकाळात चांगल्या तऱ्हेने जीवन जगता यावे, ह्यासाठी केलेली ही एक योजना आहे कोणत्याही योजना राबवताना मानवी स्वभावांच्या कंगोऱ्यामुळे अनेक अडचणी / व्यत्यय येत असतात. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत असतात. परिणामतः निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यास विलंब होतो. विशेष करून एखादा कर्मचाऱ्याचे / निवृत्ती वेतन धारकाचे निधन झाल्यास कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यास फारच वेळ लागतो. मग त्या कुटुंबांनी कसे जगायचे असा प्रश्न उभा राहतो.

अशा विलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी बृहन्मुंबई मनपा प्रशासनाने एक खास यंत्रणा निर्माण केली आहे. ही यंत्रणा द्विस्तरीय आहे. प्रत्येक खात्यातील वरिष्ठ अधिकारी, आस्थापना विभागातील संबंधित कर्मचारी, दक्षता निरीक्षक व तक्रार करणारा निवृत्ती कर्मचारी एकत्रीत येऊन तक्रारींचा निपटारा करतील, अशी संकल्पना आहे. पहिल्या स्तरावर म्हणजेच खाते / विभाग पातळीवर संयुक्त बैठकांचे, नियमित काळात आयोजन होणे अपेक्षित आहे. यास विभाग अदालत असे म्हणतात. ज्या निवृत्ती कर्मचाऱ्यांची तक्रार असेल त्याने आपल्या कार्यालयात जाऊन अर्ज करणे क्रमपात्र आहे.

अशा तऱ्हेच्या अनेक प्रश्नांचे निरसरन विभागवार अदालतीमध्ये होऊ शकते. निवृत्तीवेतन दावे निकालात काढण्यासाठी नियमांच्या अधिन राहून दक्षता निरीक्षक मार्गदर्शन करतात. या विभागवार अदालतीला त्या विभागातील सहाय्यक आयुक्त / अधिष्ठाता, आस्थापना विभागातील कार्यालय अधीक्षक, मुख्य लिपिक, लिपिक व व निवृत्ती कर्मचारी तसेच प्रमुख लेखापाल (कोषागार) खात्यातील दक्षता निरीक्षक हजर असतात. प्रत्येक महिन्यात अदालत घेतली जावून दावा काढताना येत असलेल्या अडचणींचे निरसन केले जाते. तरीही संबंधित कर्मचारी / अधिकारी दाव्यातील त्रुटींची विनाकारण पूर्तता न करता पाठवत आहे असे निदर्शनास आले तर त्यास समज देण्यात येते, तरीही छोट्या छोट्या त्रुटी ठेवत असल्यास संबंधित कर्मचाऱ्याची खात्यांतर्गत चौकशी होऊ शकते.

खाते / विभाग स्तरावर अडचण दूर होत नसेल तेव्हा विहित नमुन्यात उच्चस्तरीय पेन्शन अदालतीसाठी अर्ज करता येतो. उच्चस्तरीय पेन्शन अदालत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी सकाळी ११ वाजता आयोजित केली जाते. सदर अदालत, प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख कर्मचारी अधिकारी व एक उप कायदा अधिकारी, दक्षता प्रमुख लेखा अधिकारी, दक्षता निरीक्षक, संबंधित विभागातील कर्मचारी व अर्जदार यांच्या उपस्थितीत भरत असते .

अर्जदाराने, विहित नमुन्यातील अर्ज आपल्या मूळ खात्याच्या कार्यालयाकडे पाठविणे गरजेचे आहे. असे अर्ज विभागीय स्तरावर करण्यात आलेल्या छायांकित प्रतीसह उच्चस्तरीय पेन्शन अदालती मध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रमुख लेखापाल (कोषागार) खात्यातील लेखा अधिकारी एफ.पी.पी विभागाकडे पाठवावे.

प्रलंबित प्रकरणाबाबत उच्चस्तरीय पेन्शन अदालतीत, संबंधित प्रकरणांबाबत आढावा घेऊन, तद्अनुषंगाने निर्णय घेऊन आदेश पारित केले जातात. हे आदेश सर्व संबंधितांवर बंधनकारक असतात.

बृहन्मुंबई मनपा पेन्शनर्स असोसिएशनचे प्रतिनिधी अदालतीमध्ये संबंधित प्राप्त झालेल्या तक्रारींचा अभ्यास करून, प्रश्न मांडून अर्जदारास निवृत्ती वेतन मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असतात.

पेन्शन अदालतीसाठी करावयाच्या अर्जाचा मसुदा वेबसाईटवर उपलब्ध केला आहे.